VILLAGE PANCHAYAT QUERIM – TIRACOL, TALUKA - PERNEM - GOA.
ग्रामपंचायत कार्यालय केरी–तेरेखोल, पेडणे– गोवा

Ref.No. VP/QT/PER/RESO/2014-15/ 480 Ph: (0832) 2249161

Date :- 28/10/2014

# TRUE COPY OF SPECIAL GRAMSABHA RESOLUTION NO. 03 DATED 26/10/2014

विषय :- केरी – तेरेखोल पुलाचे काम लवकरात लवकर होण्याबाबत सरकारकडे मागणी करणेबाबत .

ठराव :- आजच्या ग्रामसभेमध्ये केरी – तेरेखोल दरम्यान होणाऱ्या पुलासंबंधी सविस्तर चर्चा करण्यात आली. एकूण अनेक वर्षे तेरेखोल व केरी ग्रामस्थ ही मागणी करीत होते. तेरेखोल गाव हा गोव्याचा अविभाज्य भाग असून त्याला गोव्याशी जोडण्यासठी पुलाची अत्यंत आवश्यकता आहे. तेरेखोल नदी ही समुद्रास लागुन असल्यामुळे फेरी सेवा धोकादायक आहे . लाटांमुळे अनेक वेळा फेरी वाहत गेल्याचेही प्रसंग घडले आहेत. ऐतिहासीक तेरेखोल किल्ला आणि संबंधित पर्यटनालाही या पुलामूळे महत्व लाभेल. उच्च दर्जाचे व पर्यावरणाशी समतोल साधणारे शाश्वत पर्यटन य पुलामूळे आकर्शित होईल. गोवा मुक्तिनंतरच्या काळात मागास राहिलेल्या या भागाचा सर्वार्थाने विकास होण्यास मदत होईल. तसेच या पुलामूळे लोकांच्या व्यावसायाला चालना मिलेळ.

त्यामुळेच या नदीवर होणारा केरी – तेरेखोल पुल, सर्व सोपस्कार पुर्ण करुन लवकरात लवकर म्हणजेच एक ते दिड वर्षात स्थानिक प्रवाशांच्या सोयीसाठी उपलब्ध व्हावा असा ठराव संमत करण्यात आला . सदर ठरावाची प्रत मा. पंचायतराज मंत्री – गोवा राज्य व मा. मुख्यमंत्री – गोवा राज्य यांना पाठविण्याचे ठरले.

या चर्चेत श्री डायगो रॉड्रीगीस , श्री मिलींद केरकर , श्री तातोबा तळकर, श्री आनंद शिरगांवकर व श्री मिलींद तळकर यांनी भाग घेतला व ठराव सर्वानुमते पास झाला.

सुचक:– श्री मिलींद तळकर
अनु.:– श्री तातोबा तळकर
ठराव सर्वानुमते पास.

SECRETARY
Village Panchayat Querim - Tiracol
Tal.: Pernem - Goa

SARPANCH
Village Panchayat Querim - Tiracol
Tal.: Pernem - Goa